# भ्रष्टाचार - भारतापुढील एक आव्हान

प्रा. संतोष संभाजी डाखरे,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, राजे विश्वेश्वरराव कला-वाणिज्य महाविद्यालय, भामरागड, जि. गडचिरोली

..........................................................................................................................................................................

**प्रस्तावना :**

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताला ओळखले जाते. तसेच एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणूनही भारताची ओळख आहे. भारतामध्ये विविध धर्मसंस्कृती असूनही गेल्या सहा दशकात येथील लोकशाही संरचनेला अजूनही तडा गेलेला नाही. असे असतानाही बाह्यस्वरुपात भारत देश लौकीकास पात्र असेलही. मात्र अंतर्गतदृष्ट्या भारत कमकुवत झालेला आपणास दिसून येतो. आज भारतासमोर अनेक अडचणी व समस्यांचा डोंगर आहे. वाढती लोकसंख्या, महागाई, बेरोजगारी, निरक्षरता, नक्षलवाद प्रादेशिकता, जातीभेद, धर्मभेद इ. परंतू याहीपेक्षा सर्वात मोठी कोणती समस्या असेल तर ती आहे भ्रष्टाचार.

आज भारतातील सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार बोकाळलेला दिसून येतो. सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थीक, शैक्षणिक क्षेत्र असो किंवा महसुल, लष्कर, संरक्षण, दळणवळण, खेळ, बांधकाम यासारख्या असंख्य क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार दिसून येतो. भारतामध्ये भ्रष्टाचार इतका बळकावला आहे की पूर्वी ज्या भारताची ओळख गांधीचा देश म्हणून व्हायची त्याच भारताची ओळख आज भ्रष्टाचारावरुन होताना दिसून येत आहे.भारताला भ्रष्टाचाराची लागण स्वातंत्र्य प्राप्तीपासूनच झाल्याचे दिसून येते. पंडीत नेहरुंच्या मंत्रीमंडळातील काही मंत्रीसुद्धा भ्रष्टाचारलिप्त असल्याचे पुरावे उपलब्ध आहे. मात्र तेव्हा भ्रष्टाचाराचे स्वरुप काही लाखाच्या घरात होते. मात्र आता अब्जोवधी रुपयांचा भ्रष्टाचार सुध्दा सहज होऊन गेलेला आहे. २ जी स्पेक्ट्रम घोटाळा ४००० कोटीच्या घरात होता, तर त्यापाठोपाठ कॉमनवेल्थ गेम घोटाळा सुध्दा हजारो कोटींचा होता. यासोबतच सर्वात चर्चेचा ठरलेला कोळसा घोटाला तर लाखो कोटींचा होता. असे एक ना अनेक घोटाळे आता सातत्याचे झाले आहे. जनतेला सुध्दा या घोटाळ्यांची, भ्रष्टाचाराची जणू आता सवयच झाली आहे. असा एकही दिवस उजाडत नसेल की ज्यादिवसी वृत्तपत्रामध्ये, टिव्हि चॅनेल्सवर भ्रष्टाचाराची बातमी नसेल.भ्रष्टाचारामुळे देशाची अर्थव्यवस्था मोडकळीस आल्याचे आणि समाजस्वास्थ बिघडल्याचे दिसून येते. भ्रष्टाचारामुळे गरीब-श्रीमंत यामधील दरी प्रकर्षाने जाणवते. श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिकच गरीब होत चालला आहे. एकीकडे गरीबांची भाकरीच्या एका तुकड्यासाठी वणवण चालू आहे, तर दुसरीकडे लाखो टन अन्नधान्य गोदामामध्ये सडत असल्याचे चित्र आहे. एकीकडे लाखो लोकांना हक्काचे छत/घर नाही तर दुसरीकडे मुकेश अंबानीच्या एका परिवाराला ५०० कोटीची २७ मजली ॲन्टिलिया इमारतही अपुरी पडत आहे. भ्रष्टाचारामुळे सर्वसामान्यांना दैनंदिन कामे करणेही कठीण होवून बसले आहे. चवली-पावली दिल्याशिवाय साधे कामही होत नसल्याचा सर्वांचा अनुभव आहे. गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत सर्व व्यवस्थाच भ्रष्टाचाराने माखून गेली आहे.

प्रशासकीय भ्रष्टाचार तर जनतेचा चर्चेचा विषय आहे. सर्वात अधिक भ्रष्टाचार जर कुठे असेल तर तो प्रशासनात आहे. आणि प्रशासनाशी सर्वांचा संबंध येत असतो. प्रशासनातील भ्रष्टाचार उपटून काढण्यासाठी १९५५ मध्ये प्रशासकीय दक्षता विभागाची स्थापना करण्यात आली. त्यास गृहखात्याशी जोडण्यात आले. दक्षता विभागाचा उद्देश

१) भ्रष्टाचारविरोधी सर्व स्तरावर कृति करणे.

२) भ्रष्टाचार प्रतिबंध करण्यासाठी प्रशासनात समन्वय प्रस्थापीत करणे.

३) भ्रष्टाचारी व्यक्तीच्या विरोधात कडक कारवाई करणे.

प्रशासकीय दक्षता विभागाची स्थापना होऊन ६० वर्ष झाले तरीही प्रशासनातील भ्रष्टाचार कमी होण्याऐवजी वाढतच आहे.त्यानंतर १९६२ मध्ये भारत सरकारने संथानाम समितीची स्थापना केली. प्रशासनातील भ्रष्टाचार उघडकीस आणणे, भ्रष्टाचाराच्या विविध पध्दती उघड करणे, भ्रष्टाचारास प्रतिबंध करण्यासाठी उपाय सुचविणे हा या समितीचा उद्देश होता. या समितीने भ्रष्टाचार रोखण्यासाठी केंद्रीय दक्षता आयोग स्थापन करण्याची शिफारस केली. यानुसार १९६४ मध्ये केंद्रिय दक्षता आयोगाची स्थापना करण्यात आली. मात्र हा आयोग स्थापन होवूनही भ्रष्टाचाराच्या प्रकरणामध्ये कमी आलेली नाही.

**जगातील प्रामाणिक देश**

| देश | क्रमांक | देश | क्रमांक |
|---|---|---|---|
| न्युझीलंड | १ | ब्रिटन | १६ |
| डेन्मार्क | २ | अमेरिका | २४ |
| फिनलँड | ३ | चीन | ७६ |
| स्वीडन | ४ | श्रीलंका | ८४ |
| सिंगापूर | ५ | भारत | ९७ |

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, जगातील प्रामाणिक देशाच्या यादित भारताचा क्रमांक ९७ आहे. उदयोन्मुख जागतिक महाशक्ती म्हणून भारताकडे पाहीले जाते. या पार्श्वभूमीवर भारतासाठी निश्चितच ही लाजिरवाणी बाब आहे.

**भ्रष्टाचाराची कारणे**

**१) भ्रष्ट राजकीय व्यवस्था :-**आपली राजकीय व्यवस्था पूर्णपणे भ्रष्ट झालेली आहे. सत्तेचा सोपान चढण्याकरीता प्रत्येकामध्ये चढाओढ लागलेली आहे. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पुन्हा पैसा असे जणू समिकरणच झाले आहे. मुळातच भ्रष्ट लोकांचा भरणा राजकीय व्यवस्थेमध्ये अधिक झाल्याने शासन प्रशासनामध्ये त्याचे पडसाद दिसून येत आहे.

**२) वशिलेबाजी :-**वशिलेबाजी शिवाय नोकरी मिळविणे, काम करवून घेणे अशक्य झाले आहे. गुणवत्ता असनूही वशिलेबाजी अभावी पद प्राप्त होत नाही. शासकीय, निमशासकीय, खाजगी अशा सर्वच क्षेत्रात वशिलेबाजी दिसून येते.

**३) नैतिकतेचा ऱ्हास :-**नैतिकता आता नावापुरतीच राहीली आहे. लाच घेताना आणि देताना कसलीही भिती कुणाच्या मनात राहत नाही. नितिमत्तेचा पाठ शिकविणाऱ्या महापुरुषांच्या तसबिरीखालीच लाच स्विकारताना कर्मचाऱ्याच्या मनात कसलिही लाज नसते.

**४) बेरोजगारी :-**भारतामध्ये बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. हजारो बेरोजगारांना हाताला काम मिळणे दुरापास्त झाले आहे. अशावेळेस बेरोजगारांना जेव्हा एखादा अस्थायी स्वरुपाचा रोजगार मिळतो, तेव्हा अशा रोजगारातून जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न केला जातो आणि भ्रष्टाराला वाव मिळतो. बरेचदा अशा बेरोजगारांची वरील अधिकाऱ्यांकडून आर्थिक शोषण केले जाते. त्यांच्या कामाचा योग्य तो मोबदला न देता त्यामध्ये भ्रष्टाचार केला जातो.

**५) निवडणूकांमधील खर्च :-**निवडणूकांमधील अफाट खर्च हे भ्रष्टाचार वाढीमधील एक प्रमुख कारण आहे. निवडणूकांमध्ये राजकीय पक्षांकडून वारेमाप खर्च केला जातो. निवडणूकीमध्ये निवडून येण्यासाठी उमेदवारांमध्ये चढाओढ चाललेली असते. जो उमेदवार पैसा जास्त खर्च करेल त्याच्या विजयाची शक्यता अधिक असते. यामध्ये वापरण्यात येणारा पैसा हा बहुतांशी काळा पैसाच असतो. निवडणूक आयोगाने प्रत्येक उमेदवाराला खर्च मर्यादा घालून दिलेली आहे. मात्र मर्यादेपेक्षा कितीतरी अधिक पैसा निवडणूकांमध्ये खर्च केला जातो. अशा माध्यमातून निवडून आलेली व्यक्ती खर्च केलेला पैसा वसुल कसा करता येईल या प्रयत्नात असतो. त्यामुळे आपल्या पदाचा गैरवापर करुन तो पैसा प्राप्त करीत असतो.

**६) निरक्षरता :-**निरक्षरता हे सुध्दा भ्रष्टाचार वाढीमागील एक कारण आहे. कारण निरक्षर किंवा अज्ञान लोकांना आपण कुठे फसल्या जात आहो याचे ज्ञ ाान नसते, साध्या-साध्या कामासाठीही त्यांना भ्रष्टाचाराला बळी पडावे लागते. सामान्य जनतेच्या अज्ञानाचा फायदा घेवून अधिकारीवर्ग त्यांचे आर्थिक शोषण करीत असतो.

**७) कमी वेतन :-**बऱ्याच क्षेत्रात कर्मचाऱ्यांना तुटपूंजे वेतन मिळते. मिळणाऱ्या वेतनामध्ये घरखर्च चालविणे, आपल्या दैनंदिन गरजा भागविणे त्यांना शक्य होत नाही. त्यामुळे अन्य मार्गाने पैसा कसा मिळविता येईल या प्रयत्नात ते असतात. यातून भ्रष्टाचाराची सुरुवात होते.

**८) सरकारी योजनांच्या अंमलबजावणीमधील अपयश :-**सरकारी योजनांच्या अंमलबजावणीमध्ये बरेचदा त्रुटी आढळतात. केंद्रातून एखाद्या योजनेला १००रु.मंजूर झाले असतील तर खालील स्तरावर फक्त १५ रु. पोहोचतात. अनेक सरकारी योजना या अधिकारी वर्गाला मलिंदा मिळवून देणाऱ्या असतात. सरकारी योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला जातो.

**९) किचकट सरकारी धोरण :-**भारतीय सरकारी धोरण हे जटील असेच आहे. एखाद्या कामासाठी, प्रकल्प उभारणीसाठी परवानगी घ्यायची असेल तर अनेक दिव्यातून जावे लागते. फाईल एका टेबलवरुन दुसऱ्या टेबलवर असा प्रवास करीत असते. या प्रक्रीयमध्ये कित्येक महिने निघून जातात. त्यामुळे सहज काम करुन घेण्यासाठी संबंधीत व्यक्तीकडून भ्रष्टाचाराचा मार्ग अवलंबीला जातो.

**१०) भौतिक सुख सुविधेचा हव्यास :-**बरेचदा भौतिक सुख सुविधा, चैन, चंगळवाद यामुळे सुध्दा भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत असते. इतरापेक्षा श्रेष्ठ कसे राहता येईल, सुख सोयीमध्ये कसे राहता येईल याचा विचार व्यक्ती करतो. मर्यादित मिळकतीमधून प्रत्येक गोष्टीची पूर्तता करणे जेव्हा शक्य होत नाही तेव्हा भ्रष्ट मार्गाने अधिकचा पैसा मिळविण्याकडे त्याचा कल जातो.

**११) राजकारणाचे व्यावसायीकरण :-**आज घडीला राजकारण हा व्यवसाय बनलेला आहे. एखाद्या व्यवसायामध्ये जशी गुंतवणूक केली जाते तशीच गुंतवणूक राजकारणामध्ये केली जाते. अनेक उमेदवार करोडो रुपये खर्च करुन निवडून येतात आणि विविध भ्रष्ट मार्गाचा अवलंब करुन खर्च केलेला पैसा परत मिळवितात. असे करताना नितीमत्ता, राष्ट्रविकास याकडे सर्रास दुर्लक्ष केले जाते.

**१२) कमकुवत कायदा :-**भ्रष्टाचारविरोधी अस्तित्वात असलेला कायदा हा कमकुवत आहे. या कायद्यान्वये भ्रष्टाचारी व्यक्तीला कठोर शिक्षा झाल्याचे प्रमाण अत्यल्प आहे. तसेच कायदामध्ये पळवाटासुध्दा बऱ्याच आहे. नेमका याचाच फायदा भ्रष्टाचारी व्यक्तीकडून उचलला जातो. कितीही मोठा भ्रष्टाचार केला तरी काही दिवसांतच आपण जेलमधून बाहेर येवू असा विश्वास भ्रष्टाचारी लोकांमध्ये निर्माण होतो. त्यामुळे भ्रष्टाचार करण्यास ते प्रवृत्त होतात.राष्ट्रकूल क्रिडा स्पर्धेमध्ये हजारो कोटींचा घोटाळा करणारे सुरेश कलमाडी चार महिन्यांच्या तुरुंगवारीनंतर आज उजळमाथ्याने समाजात वावरताना दिसून येते. अशा उदाहरणामुळे अन्य लोकांना कायद्याची भिती वाटत नाही व ते भ्रष्टाचार करण्यास धजावतात.

**१३) देशहितापेक्षा स्वहितास प्राधान्य :-**भारतीय नागरिकांमध्ये देशहितापेक्षा स्वहितास प्राधान्य देण्याची प्रवृत्ती दिसून येते. या प्रवृत्तीमुळे मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय संपत्तीचा अपहार होतो. देशाचे नुकसान ते माझे नुकसान अशी मनोवृत्ती नागरिकांची नसते.

**१४) अयोग्य व्यक्तिंची निवड :-**अनेकदा शासकिय, सार्वजनिक पदावर अयोग्य व्यक्तिची निवड केली जाते. अशा व्यक्ती आपल्या पदाला न्याय देवू शकत नाही. वशिलेबाजी, परिक्षेत अफरातफर करुन अशा व्यक्ती पदावर बसलेल्या असतात. नोकरी मिळविण्याकरीता मोठी रक्कम त्यांनी मोजलेली असते. त्यामुळे अशा व्यक्ती पदावर आल्यानंतर भ्रष्टाचार करुन पैसा मिळविण्याचा प्रयत्न करतात.

**भ्रष्टाचाराचे परिणाम**

राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्राला भ्रष्टाचाराची लागण झाली असून भ्रष्टाचार हा भारताच्या प्रगतीमध्ये मुख्य अडसर ठरला आहे. भ्रष्टाचाराचे अनेक दुष्परिणाम दिसून येतात.भ्रष्टाचारामुळे देशाची कार्यक्षमता मंदावते. अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची प्रतिमा खराब होते. राष्ट्रीय संपत्तीचा मोठ्या प्रमाणावर अपहार होतो. लोकांमध्ये स्वार्थी प्रवृत्ती वाढीस लागते. सर्वसामान्य जनतेला काम करुन घेताना अडचणी येतात. शासन प्रशासनावरचा त्यांचा विश्वास उडतो. भ्रष्टाचाराची सवय लागलेली व्यक्ती अधिकच शिरजोर होते. कायदा आपले काहीच करु शकत नाही या विश्वासाने पुन्हा भ्रष्टाचार करण्यास धजावते. सरकारच्या उत्पन्नामध्ये घट होते. टॅक्स गोळा करताना अडचणी येते. भ्रष्टाचाराच्या माध्यमातून जमा केलेला पैसा विदेशात ठेवला जातो. शासनाच्या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचत नाही. गरीब अधिक गरीब तर श्रीमंत अधिक श्रीमंत होतो. मुठभर लोकांच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण होते. बेरोजगारी, चंगळवाद, व्यभिचार यामध्ये वृध्दी होते. या सर्वांचा परिपाक म्हणजे लोकशाही व्यवस्था कमजोर होते.

**भ्रष्टाचारावरील उपाय योजना** भारतातील भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे. भ्रष्टाचार पूर्णपणे संपुष्टात आणने कठिण असले तरी काही उपाययोजना केल्यास त्याचे प्रमाण निश्चितच कमी करता येईल.

१) राजकीय नेत्यांच्या सांपत्तीक स्थितीची चौकशी आयकर खात्यातर्फे सतत व्हायला पाहीजे.
२) गुन्हेगारास उमेदवारी देणाऱ्या पक्षाची मान्यता काढून घेण्यासाठी नियम तयार करण्यात यावे.
३) प्रशासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता असायला हवी. नागरिकांना माहिती जाणून घेण्याचा अधिकार प्राप्त झाला असला तरी त्याची अमलबजावणी निट होत नाही. त्यामुळे माहितीच्या अधिकाराची योग्य अमलबजावणी व्हायला हवी.
४) भ्रष्टाचाराचे खटले चालविण्यासाठी स्वतंत्र न्यायालयाची व्यवस्था असावी.
५) भ्रष्टाचारी व्यक्तींना त्वरीत शिक्षा मिळावी.
६) योग्य व प्रामाणिक व्यक्तींची पदावर नियुक्ती करणे.
७) विदेशातील जमा काळा पैसा शासनाने परत आनणे.
८) राजकीय नेत्यांचा पोलिस प्रशासन व न्यायव्यवस्थेमधील हस्तक्षेप रोखणे.
९) बेरोजगारीचे प्रमाण कमी करणे.
१०) राजकीय गुन्हेगारीकरण रोखण्याकरिता गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना निवडणूका लढविण्यास बंदी घालणे.
११) जनतेने पुढाकार घेवून विविध क्षेत्रातील भ्रष्टाचार उघड करणे.
१२) साठेबाजी, नफेखोरी रोखणे तसेच मध्यस्थ किंवा दलाल ही संकल्पना संपुष्टात आनणे.
१३) निवडणूक प्रक्रिया पारदर्शक करण्याचा प्रयत्न करणे.
१४) महत्वाच्या कार्यालयात सिसिटिव्ही यंत्रणा उभारणे.
१५) शासकिय योजनांची अंमलबजावणी यशस्वीपणे करणे.
१६) प्राथमिक स्तरापासून विद्यार्थ्यांना नैतिकतेचे पाठ देणे, संस्कार शिबीराचे आयोजन करणे.
१७) थोर पुरुष, विचारवंत, समाजसुधारक यांच्या कार्याची माहिती, चर्चा सर्वसामान्यापर्यंत पोहोचविणे.
१८) प्रामाणिक कर्मचारी, व्यक्ती यांचा सत्कार करणे.

**सारांश :-**

भ्रष्टाचार ही भारतापुढील मोठी समस्या असली तरी ती नष्ट होणारच नाही असा समज करणे गैर आहे. समूळ नष्ट होणार नसली तरी काही उपाययोजनांचा अवलंब करुन बऱ्याच अंशी भ्रष्टाचार कमी करणे शक्य आहे. श्री अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचारविरोधी केलेले कार्य प्रशंसनिय आहे. ऑगस्ट २०११ ला दिल्ली येथील जंतरमंतरवरुन जनलोकपालासाठी सुरु केलेला लढा आज पूर्णत्वास गेलेला आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात लोकपाल विधेयक मंजूर झाले असून लवकरच त्याचे कायद्यात रुपांतर होईल.

गेली ४५-५० वर्ष जे विधेयक संसदेत पडून होते ते आज पुर्णत्वास गेले. अण्णा हजारे यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, लोकपाल विधेयकाने १०० टक्के भ्रष्टाचार जरी संपुष्टात येणार नसला तरी ६०-७० टक्के भ्रष्टाचाराला आळा बसेल. लोकपाल, माहितीचा अधिकार यांचा योग्य वापर केल्यास, प्रत्येक नागरिकाने प्रथम देश नंतर मी या तत्वानुसार आचरण केल्यास भ्रष्टाचार समुळ नष्ट होण्यास वेळ लागणार नाही.

**संदर्भ सूची -**

१) माहितीचा अधिकार, मुल निवासी प्रचार-प्रसार केंद्र, नागपूर, २०१०
२) राजकीय नेतृत्व, डॉ. ना. रा. खेकाळे, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९९
३) दैनिक लोकमत, ऑगस्ट २०११
४) दैनिक सकाळ, डिसेंबर २०१३
५) माहितीचा अधिकार, अण्णा हजारे, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यास, राळेगणसिध्दी, अहमदनगर, २००६